**Association Of The Managements Of Un-aided Engineering Colleges (Mah.)**
**(Reg. No. MH / 8081 / 03 / Nashik, dtd. 27-05-2003)**

**C/o. K. K. Wagh Education Society,** Amrutdham, Panchavati, **NASHIK - 422 003**,
Maharashtra ☎ (0253) 2221118, 2629048 **Fax :** (0253) 2629048, 2515791
Email : engg_asso@rediffmail.com Website : www.enggassociation.org

जा. क्रं.:/इंजि.असो./सी.ओ/ 44 /२०१५ दिनांक : 19 FEB 2015

**प्रति,**
**मा.श्री.विनोद तावडे साो.**
**उच्च व तंत्रशिक्षण मंत्री,**
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**विषयः- खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.**

**संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः टीईएम-२०१४/प्र.क्र.१४९/तांशि-४, दिनांक ०३ जुलै, २०१४.**
**२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः टीईएम-२०१४/प्र.क्र.१५१(ब)/तांशि-४, दिनांक ०३ जुलै १४.**
**३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः टीईएम-२०१४/प्र.क्र.१५१/तांशि-४, दिनांक १४ जुलै २०१४.**
**४) मा. उच्च न्यायालय यांचे WP No. 11022/2014 मधील निर्णय दि.२९/०१/२०१५.**

मा. महोदय,

'असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड इंजिनिअरींग कॉलेजेस् (महा.)' ही राज्यस्तरीय नोंदणीकृत संस्था असुन महाराष्ट्रातील २३३ विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये ही असोसिएशनचे सभासद आहेत. विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयाचा गुणात्मक दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने विविध सेमिनार, कॉन्फरन्सचे आयोजन असोसिएशन मार्फत केले जाते. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, संबंधित विद्यापीठ व संबंधीत विभागाकडे संस्थाचालकांचे विविध प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने असोसिएशन प्रयत्नशील आहे.

वरील संदर्भिय उच्च न्यायालयाचे आदेश सुलभ संदर्भासाठी सोबत जोडत आहोत व असोसिएशनच्यावतीने खालीलप्रमाणे म्हणणे सादर करीत आहोत.

१) वरील संदर्भिय १ मधील नमूद शासन निर्णयातील Clause No. 14 खालीलप्रमाणे.

**"या शासन निर्णयाद्वारे Annexure-B मधील ज्या नवीन संस्थांना व ज्या अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली आहे, अशा ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे राज्य शासनामार्फत प्रस्ताव सादर न करता थेट प्रस्ताव सादर केले आहेत व ज्यांना राज्य शासनानची नकारात्मक शिफारस आहे, अशा नवीन संस्थांना/अभ्यासक्रमांना राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी फ़ी-प्रतिपुर्तीची योजना लागू राहणार नाही. त्याकरीता संचालक, तंत्र शिक्षण यांनी संबंधीत संस्थांकडून तशा आशयाचे नोटराईज शपथपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्यांनतरच पुढील आवश्यक ती कार्यवाही संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी."**

*पुढील पानावर...*

२) वरील संदर्भिय २ व ३ मधील नमूद शासन निर्णयातील Clause No. 14 खालीलप्रमाणे.

**''या शासन निर्णयाद्वारे ज्या नवीन अभ्यासक्रमांना अथवा अभ्यासक्रमातील प्रवेशक्षमता वाढीला मान्यता देण्यात आली आहे, अशा ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे राज्य शासनामार्फत प्रस्ताव सादर न करता थेट प्रस्ताव सादर केले आहेत व ज्यांना राज्य शासनाची नकारात्मक शिफारस आहे, अशा नवीन अभ्यासक्रमांना/प्रवेशक्षमता वाढीला राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी फी-प्रतिपुर्तीची योजना लागू राहणार नाही. त्याकरीता संचालक, तंत्र शिक्षण यांनी संबंधीत संस्थाकडून तशा आशयाचे नोटराईज शपथपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्यानंतरच पुढील आवश्यक ती कार्यवाही संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी''.**

संदर्भिय तीनही शासन निर्णयाची प्रत सोबत जोडलेली आहे. **(परिशिष्ट १)**

३) वर १ व २ मध्ये नमूद Clause No. 14 च्या विरोधात असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड इंजिनिअरींग कॉलेजेस् (महा.) च्यावतीने मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका (Writ Petition No. 11022/2014) दाखल करण्यात आलेली होती.

४) मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमुर्ती मा. एस. व्ही. गंगापुरवाला व न्यायमुर्ती मा. एन.डब्ल्यु. सांबरे या खंडपीठाने दि. २९/०१/२०१५ रोजी सोबत जोडलेल्या महाविद्यालयामध्ये / कोर्समध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कची प्रतिपुर्ती करणेबाबत निर्णय दिलेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत सोबत जोडलेली आहे **(परिशिष्ट २)**. तसेच पेटीशनर महाविद्यालयाची/ब्रॅचची यादी सोबत जोडलेली आहे. **(परिशिष्ट ३)**

आपणांस विनंती करण्यात येते की, याबाबत संबंधीत उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सुचना देण्याबाबत विनंती.

आभारी आहे.

Association of the Managements of Un-aided Engineering Colleges Reg. No. MH / 8081 / 03 Nashik. Dtd.27/5/2003 Maharashtra

आपला विश्वासू,

(बाळासाहेब दे. वाघ)
अध्यक्ष,
असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड
इंजिनिअरींग कॉलेजेस् (महा.)

**सोबतः- परिशिष्ट १ ते ३**

**Association Of The Managements Of Un-aided Engineering Colleges (Mah.)**
**(Reg. No. MH / 8081 / 03 / Nashik, dtd. 27-05-2003)**
**C/o. K. K. Wagh Education Society,** Amrutdham, Panchavati, **NASHIK - 422 003**, Maharashtra ☎ (0253) 2221118, 2629048 **Fax :** (0253) 2629048, 2515791
Email : engg_asso@rediffmail.com Website : www.enggassociation.org

जा. क्रं.:/इंजि.असो./सी.ओ/39 /२०१५ दिनांक : 19 FEB 2015

प्रति,
मा. सचिव सो.,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**विषयः- खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.**

**संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः टीईएम-२०१४/प्र.क्र.१४९/तांशि-४, दिनांक ०३ जुलै, २०१४.**
**२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः टीईएम-२०१४/प्र.क्र.१५१(ब)/तांशि-४, दिनांक ०३ जुलै १४.**
**३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः टीईएम-२०१४/प्र.क्र.१५१/तांशि-४, दिनांक १४ जुलै २०१४.**
**४) मा. उच्च न्यायालय यांचे WP No. 11022/2014 मधील निर्णय दि.२९/०१/२०१५.**

Clerk
Higher and Technical Education Department
Mantralaya Annexe
Mumbai 400 032
20/2/15

मा. महोदय,

'असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ अन-एडेड इंजिनिअरींग कॉलेजेस् (महा.)' ही राज्यस्तरीय नोंदणीकृत संस्था असुन महाराष्ट्रातील २३३ विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये ही असोसिएशनचे सभासद आहेत. विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयाचा गुणात्मक दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने विविध सेमिनार, कॉन्फरन्सचे आयोजन असोसिएशन मार्फत केले जाते. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, संबंधित विद्यापीठ व संबंधीत विभागाकडे संस्थाचालकांचे विविध प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने असोसिएशन प्रयत्नशील आहे.

वरील संदर्भिय उच्च न्यायालयाचे आदेश सुलभ संदर्भासाठी सोबत जोडत आहोत व असोसिएशनच्यावतीने खालीलप्रमाणे म्हणणे सादर करीत आहोत.

१) वरील संदर्भिय १ मधील नमूद शासन निर्णयातील Clause No. 14 खालीलप्रमाणे.

> **"या शासन निर्णयाद्वारे Annexure-B मधील ज्या नवीन संस्थांना व ज्या अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली आहे, अशा ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे राज्य शासनामार्फत प्रस्ताव सादर न करता थेट प्रस्ताव सादर केले आहेत व ज्यांना राज्य शासनानची नकारात्मक शिफारस आहे, अशा नवीन संस्थांना/अभ्यासक्रमांना राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी फी-प्रतिपुर्तीची योजना लागू राहणार नाही. त्याकरीता संचालक, तंत्र शिक्षण यांनी संबंधीत संस्थांकडून तशा आशयाचे नोटराईज शपथपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्यांनतरच पुढील आवश्यक ती कार्यवाही संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी."**

*पुढील पानावर...*